**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**

e-mail:- msboardnagpur@gmail.com  www.nagpureduboard.in

पत्र क.नाविमं/प.उ.मा./1270
नागपूर, दि. 21/04/2025

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर

**विषय** :– फेब्रुवारी/मार्च–2025 माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) विद्यार्थ्याचा APAAR ID नोंदवून घेणेबाबत.

**संदर्भ** :–1) राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क./गणकयंत्र/45/1919, पुणे –411004. दिनांक 19/03/2025.
2) पत्र क. नाविमं/प.उ.मा./974, नागपूर, दिनांक 20/03/2025

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च 2025 च्या माध्यमिक प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) फेब्रुवारी/मार्च–2025 ला प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना निकालाचे वेळी Digilocker मध्ये विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका उपलब्ध करून दयावयाच्या आहेत. त्याकरिता APAAR ID ची नोंद घेणे आवश्यक आहे.

त्याकरिता APAAR ID नोंदविणे करिता राज्य मंडळाचे संकेतस्थळावरून www.mahahsscboard.in वर APAAR ID updation ही link उपलब्ध करून देण्यात आली आहे. संदर्भ पत्र क्र. 02 नुसार 11/04/2025 APAAR ID ची नोंद घेण्याची तारीख होती. त्यामध्ये बदल होऊन दि. 21/04/2025 पर्यंत मूदत वाढविण्यात आली होती परंतु आजपर्यंत APAAR ID ची नोंद 100% पूर्ण करण्यात आलेली नाही. आपणांस सूचित करण्यात येते की, APAAR ID पूर्ण न केल्यास मंडळ मान्यता गोठविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी :–
1) सचिव, राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.